छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

(दुरध्वनी क्र.) 0240-2333536-40 (पी.बी.एक्स.)

जा.क्र.मनपा/संगणक/2026/ 222 दिनांक : 12/10/2026

# जाहीर आवाहन

याद्वारे छत्रपती संभाजीनगर शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे दि.01 सप्टेंबर 2026 च्या शासन निर्णयान्वये नागरिकांच्या सहभागातून प्रशासकीय कार्यपध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी राज्यात सुधारणा उत्सव (Reform Utsav)-2026 हे राष्ट्रव्यापी अभियान राबविण्यात येत आहे.

सदरील अभियान अंतर्गत नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवातून महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीतील अडथळे, अनावश्यक प्रक्रिया आणि सेवा वितरणातील त्रुटी ओळखुन त्यांमध्ये आवश्यक सुधारणा करणे हा अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. त्यासाठी नागरिकांकडून महानगरपालिकेच्या सेवा प्राप्त करण्यासाठी लागणारा वेळ, आवश्यक कागदपत्रे, नागरिकांच्या कार्यालयीन भेटी, मंजूरीच्या अनावश्यक पातळया आणि प्रक्रियात्मक अडथळे कमी करून सेवा अधिक सुलभ, गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्याच्या अनुषंगाने तसेच शक्य तेथे डिजीटल माध्यमांचा वापर वाढविणे, विभागांतील समन्वय वाढविणे, कालबाह्य व अनावश्यक नियम व प्रक्रियांचे पुनरावलोकन करणे, निर्णय प्रक्रियेतील अनावश्यक टप्पे कमी करणे इ. च्या अनुषंगाने सुधारणा सूचना मागविण्यात येतआहेत.

नागरिकांनी महानगरपालिकेच्या कामकाजाच्या अनुषंगाने त्यांच्या सुधारणा दि.31 ऑक्टोबर 2026 पर्यंत संगणक विभाग, महानगरपालिका मुख्यालय येथे समक्ष दाखल कराव्यात अथवा नागरिक त्यांच्या सुधारणा सूचना contact@chhsambhajinagarmc.org या ईमेल पाठवाव्यात. प्राप्त सुचनांवर शासन निर्णयातील तरतूदीनूसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 12-10-2026
10:44:39

(अमोल येडगे) भा.प्र.से.
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका